महासागर

बुधवार दि. 26 फेब्रुवारी 2024

अमरावती

पान 6


# एमपीएससीत यशस्वी विद्यार्थी व पत्रकारांचा सत्कार



## हिवरखेड महाराष्ट्र बँकेचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.25 )-** येथील महाराष्ट्र बँकेच्यावतीने एमपीएससी परिक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थी आणि गावातील पत्रकारांचा सामाजिक योगदानासाठी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे शाखा प्रबंधक प्रशांत चरडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपशाखा प्रबंधक जन्मजय भांबुरकर आणि अजयकिशोर भांगे उपस्थित होते. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना अडचणी येतात. त्यावर मात करुन विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक दृष्टीकोन अंगीकारला पाहीजे. तर यश मिळविणे सोपे जाते. असे विचार यावेळी प्रशांत चरडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी जन्मजय भुबुरकर आणि अजयकिशोर भांगे यांनीही विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांबाबत मार्गदर्शन केले. हिवरखेड परिसरात वाचनालय निर्माण झाली पाहिजेत असा मानस साहेबराव वानखडे यांनी व्यक्त केला. त्यासाठी गावातील दानशूर लोकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी केले. अर्चना बंड यांनी मुलांचे संगोपन कसे करायचे, यावर आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात एमपीएससी परिक्षेत यश मिळविलेल्या अन्न व सुरक्षा अधिकारी रविना बबनराव नागले, महसूल सहाय्यक रेवती हरिभाऊजी राऊत आणि निर्मिती सुनीलजी बंड, पोलिस निरिक्षक मयूर श्रीरामजी गावंडे तसेच आरती रामकृष्ण बंदे व पूजा रामकृष्ण बंदे या सख्ख्या बहिणी, आरोग्य निरिक्षक हर्षल पुरुषोत्तम भुंते यांचा सत्कार करण्यात आला. कर्मचारी मदन ब्राह्मणे रयांची पदोन्नती झाल्याबद्दल तसेच हिवरखेड येथील पत्रकार जितेंद्र फुटाणे यांना सामाजिक योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला पुरुषत्तम भुंते, संजय उघडे, हरिभाऊ राऊत, पवन गाडेकर, निलेश क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन माधव हिंगणे यांनी केले.

# अमरावती परिमंडलात गत तीन महिन्यात 567 चेक बाऊंस

## आता चेक अनादर झाल्यास भरावा लागणार दंड

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )-** ऑनलाईन वीज बिल भरण्याची सोय उपलब्ध असली तरी अद्यापही अमरावती परिमंडळातील काही वीज ग्राहक दरमहा वीजबिलांचा भरणा धनादेशाद्वारे करीत आहेत. यामध्ये मात्र दरमहा सुमारे 200 ग्राहकांच्या वीजबिलांचे धनादेश न वठता परत येत असल्याचे दिसून येत आहे. अमरावती परिमंडळात नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारीमध्ये 567 चेक बाऊंस झालेले आहे. त्यामध्ये अमरावती शहर 156,ग्रामीण 77,अचलपूर 120,मोर्शी 40,यवतमाळ 89,पुसद 31,पांढरकवढा 31 आणि दारव्हा विभागातील 23 धनादेशाचा समावेश आहे.




महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील वीज ग्राहकांनी विजबिल भरण्यासाठी दिलेल्या धनादेशांपैकी अमरावती परिमंडळात दरमहा सुमारे 200 धनादेश अनादरीत (चेक बाऊंस) होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रत्येक वीज बिलासाठी विलंब आकार अधिक जीएसटी करासह 885 रुपयांचा दंड संबंधित ग्राहकाच्या पुढील महिन्याच्या वीज बिलामध्ये इतर आकार म्हणून समाविष्ट करण्यात येतो. अनादरित झालेल्या एकाच धनादेशाद्वारे अनेक वीजबिलांचा भरणा केलेला असल्यास प्रत्येक वीजबिलासाठी दंडात्मक रक्कम लावण्यात येत आहे.

यासोबतच धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सोय सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात येते. धनादेशावर चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, खात्यात पुरेशी रक्कम नसणे आदी कारणांवरून धनादेश अनादरित होत असल्याचे आढळून येत आहे.

### 885 रुपयांसह इतर आकार समाविष्ट

चेक अनादर (बाऊंस) झाल्यास किंवा न वठता परत आल्यास ग्राहकाला प्रत्येक वीजबिलासाठी 750 रुपये बँक प्रशासकीय शुल्क व त्यावरील 18 टक्के जीएसटी कराचे 135 रुपये असे एकूण 885 रुपये आणि विलंब आकार पुढील महिन्याच्या वीजबिलात इतर आकार म्हणून समाविष्ट करण्यात येतात.

# रेतीची अवैध वाहतूक करताना ट्रॅक्टरला पकडले

**अमरावती -** रेतीची अवैधरित्या वाहतुक करणार्या एका ट्रॅक्टरला शिरजगाव कसबा पोलिसांनी 23 फेब्रुवारी रोजी शितला माता मंदिराजवळ पकडले. याप्रकरणात पोलिस हवालदार सुनिल खेरडे यांच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात आरोपी सुरज गंगाराम कुसराम (28, रा. गवारीपुरा, शिरजगाव कसबा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी



घटनास्थळावरून ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा एकुण 4 लाख 55 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील कारवाई महसूल विभागामार्फत सुरु आहे.

# पैशांसाठी जीवे मारण्याची धमकी

**अमरावती -** उधारीचे दोन लाख रुपये परत दिल्यानंतरही तगादा लावून एका इसमाला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या घटनेची तक्रार शेख इरफान शेख कादर (40, रा. शेख सोहेल शेख इस्माईल, शेख जाबु शेख साबीर व शेख शब्बीर शेख साबीर (सर्व रा. अब्दुला पार्क, अमरावती) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.


# सावंगा विठोबा नगरीत चंदन उटी कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.24 )-** तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे गुरुवारी (दि.27) सकाळी 5 वाजता संस्थानचे लहान मंदिरात विधीवत ढाल बसवून मुख्य मंदिरात चैत्र मांडीचा शुभारंभ महाराजांचे गणाने विश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांचे उपस्थित होत आहे. दुपारी 4 वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त चंदन ऊटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता 'महाप्रसाद कार्यक्रम' अन्नदान दाते रुख्मिणी कृष्णराव चांगोले, अमरावती यांचे तर्फे आणि संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात आयोजित करण्यात आला आहे. संस्थानमध्ये दि.27 फेब्रुवारी 2025 ते दि.8 एप्रिल 2025 पर्यंत संस्थान तर्फे 'चैत्र मास' निमित्त 'अखंड जागृती भजन' मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बाहेर गावातील अवधूत भजन मंडळांचा सहभाग राहणार असून या करिता संस्थानचे वतीने नियोजन करण्यात आले आहे.संस्थान तर्फे सहभागी अवधूत भजन मंडळाचा सन्मान करण्यात येऊन दैनंदिन चहा,नास्ता आणि भोजन इ.व्यवस्था करण्यात आली आहे. दि.18 फेब्रुवारी 2025 रोजी संस्थानमध्ये संस्थानचे विश्वस्त मंडळाचे सामान्य सभेत गुढीपाडवा यात्रा महोत्सव नियोजनबद्ध साजरा करण्याचे दृष्टीने विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून याबाबतची माहिती प्रशासनाला देण्यात यावी, असे ठरविण्यात आले आहे. तरी सर्व भाविक-भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे वतीने करण्यात आले आहे.



# ग्रामिण हद्दीतील दोन मुलींचे अपहरण



**अमरावती -** ग्रामिण भागातील विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन अल्पवयीन मुलींना अज्ञाताने फुस लावून पळवून नेले. 23 फेब्रुवारी रोजी शेंदुरजना घाट पोलिस ठाण्यात 17 वर्षीय मुलीला कुणीतरी फुस लावून पळवून नेल्याची तक्रार कुटुंबीयांनी केली आहे. त्याचप्रमाणे परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक मुलगी खेळण्यासाठी घरातून बाहेर गेली. परंतू ती घरी परतली नाही. तिला अज्ञात इसमाने पळवून नेल्याचे तिच्या कुटुंबीयांनी तक्रारीत म्हटले आहे.

# धारणीची प्रेरणा मालविय बनली महसूल सहाय्यक

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.25 )-** धारणी येथील कु. प्रेरणा नारायण मालवीय हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण केली असून तिची महसूल सहाय्यक पदी नियुक्ती झाली आहे. अत्यंत परिश्रमातून प्रेरणाने हे यश संपादन केले व धारणीचा नावलौकिक वाढविला आहे. धारणी येथील ज्ञानमंदिर विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण मालवीय यांची प्रेरणा ही कन्या आहे. पुणे विद्यापीठातून पदवी मिळविल्यानंतर तिने पुण्यातच स्पर्धा परीक्षेची तयारी केली. महसूल सहाय्यक पदाची परीक्षा एमपीएससीमार्फत घेण्यात आली होती. ती प्रणाने उत्तीर्ण केली. प्रेरणाचे तालुक्यात अभिनंदन केले जात आहे. तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धारणी येथील किड्स केअर शाळेत झाले आहे. अमरावती जिल्ह्यात दुर्गम व



मागासलेला परिसर म्हणून धारणीची ओळख आहे. या तालुक्यात मूलभूत सुविधा नाही तसेच दळणवळणाची साधने अपुरी आहेत. या सर्व परिस्थितीवर मात करून प्रेरणा मालविय हिने एमपीएससी सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण केली. त्यासाठी तिने दाखविलेली जिद्द व चिकाटी तसेच घेतलेले परिश्रम याबद्दल तिचे कौतुक करण्यात येत आहे. प्रेरणाने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व गुरुजनांना दिले आहे.

# रणजित मनवरे हत्या प्रकरणात आरोपीला आजन्म कारावास

## कविठा येथील 2019 ची घटना | अचलपूर सत्र न्यायालयाचा निकाल

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.25 )-** कविठा येथे सुमारे साहा वर्षांपूर्वी ऑक्टोबर 2019 मध्ये घडलेल्या रणजित मनवरे हत्या प्रकरणातील आरोपी गजानन उर्फ विपिन रामकृष्ण पातोंड याला अचलपूर येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाने आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश पी. एच. खरवाडे यांनी हा निकाल दिला आहे.

परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कविठा बु. या गावात जिल्हा परिषद शाळेसमोर सहा वर्षांपूर्वी 21 ऑक्टोबर 2019 रोजी दुपारी 2 वाजता रणजित मनवरे याचा आरोपी गजानन पातोंड याच्यासोबत उधारीच्या पैशावरुन वाद झाला होता. वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. त्यावेळी गजाननने रणजित मनवरेच्या डोक्यावर लोखंडी फावड्याने जोरदार प्रहार केला



होता. गंभीर जखमी रणजितला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले होते. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचारादरम्यान 22 ऑक्टोबर 2019 रोजी त्यांचा मृत्यु झाला होता. संदीप मनवरे यांच्या तक्रारीवरुन पतरवाडा पोलिसांनी गजानन पातोंड याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली होती. तत्कालिन उपविभागीय पोलिस अधिकारी पोपटराव अबदागिरे यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी या घटनेचा तपास करुन आरोपी गजानन पातोंड याच्याविरुद्ध अचलपूर अतिरिक्त न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. न्यायालयाने याप्रकरणात एकुण 18 साक्षीपुरावे तपासले. परिस्थितीजन्य पुरावे, न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल आणि साक्षीपुराव्यांच्या आधारावर न्यायालयाने आरोपी गजानन पातोंड याला दोषी ठरविले. त्याला आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली.

तसेच दोन हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास अतिरिक्त 2 महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. याप्रकरणात सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील डी. ए. नवले यांनी बाजू मांडली. सदर प्रकरणात पीएसआय दादाराव डहाके यांनी पैरवी अधिकारी म्हणून काम पाहिले.

# इंदिरानगरात कर्मयोगी गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा,( दि.25 )-** बडनेरा जुनीवस्ती येथील इंदिरा नगर परिसरात कर्मयोगी संत वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांची 149 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते सुरेश श्रीरामवार होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दलितमित्र उत्तमराव भैसने आणि शिवाजीराव उंबरकर उपस्थित होते.



संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे हारार्पण व पुजन करून वंदन करण्यात आले. त्यानंतर गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भक्तिगीताचा भावपूर्ण व उत्साहात सामुहिक गजर करण्यात आला. याप्रसंगी हभप विनायकराव ढोले यांनी सामुहिक शक्तीचे महत्त्व या विषयावर माहिती दिली. तसेच संत गाडगेबाबा यांचे जीवन म्हणजे चालते बोलते विद्यापीठच होते असे प्रतिपादन केले. गौरव ज्ञानेश्वर वानखडे यानेही मनोगत व्यक्त केले. उत्तमराव भैसने यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगाची माहिती दिली. सुरेश श्रीरामवार यांनी समयोचित विचार व्यक्त करून कर्मयोगी गाडगेबाबा उत्सव समितीचे उत्कृष्ट आयोजनासाठी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम बडनेरकर यांनी तर आभारप्रदर्शन सुरेश वानखडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मंगेश खरबडे, सचिव ज्ञानेश्वर वानखडे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव मोहोड, सहकोषाध्यक्ष शाम बांते, संदिप इंगोले, विष्णु दुरबुडे, नामदेव निकोरे यांनी प्रयत्न केले. इंदिरानगरातील शारदा महिला मंडळाच्या वतीने याप्रसंगी भजनाचा कार्यक्रम झाला. प्रसाद वितरणाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाशिवरात्रीला शिवभक्तांची वाट बीकट

## ▶ अंजनगाव बारी-कोंडेश्वर मार्गाची दुर्दशा ▶ मागणी करुनही दुरुस्ती झालीच नाही

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.25 )-** अंजनगाव बारी - कोंडेश्वर या 3 किलोमीटर मार्गाची प्रचंड दुर्दशा झाली असून महाशिवरात्रीपूर्वी या मार्गाची दुरुस्ती व नुतणीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र बांधकाम विभागाने त्याकडे दुर्लक्ष केल्याने महाशिवरात्रीच्या पर्वावर कोंडेश्वर शिवालयात दर्शनासाठी जाणार्या शिवभक्तांची वाट बीकट होणार आहे. परिणामी भाविकांमध्ये प्रशासनाच्या विरोधात प्रचंड संताप निर्माण झाला आहे.

तिर्थक्षेत्र कोंडेश्वर येथे महाशिवरात्रीनिमित्त मोठा उत्सव साजरा केला जातो. यंदा आठ



दिवसांपासून कोंडेश्वर मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना अंजनगाव बारी आणि परिसरातील अन्य गावांमधून जाणार्या भाविकांची संख्या मोठी आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी तर हजारो शिवभक्त कोंडेश्वर शिवमंदिरात दर्शनासाठी जातात. मात्र अंजनगाव बारी - कोंडेश्वर मार्गाची प्रचंड दुर्दशा झाली असून या मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. परिणामी कोंडेश्वरला जाणार्या भक्तांचे प्रचंड हाल होत आहेत. महाशिवरात्रीपूर्वी या रस्त्याचे नुतणीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती, मात्र बांधकाम विभागाने अखेरपर्यंत त्याची दखलच घेतली नाही. त्यामुळे अंजनगाव बारी सर्कलमधील 20 गावांतील यात्रेकरूंना अडचणींचा सामना करावा लागणार आहे. कोंडेश्वर येथे जाणार्या शिव भक्तांची संख्या सध्या मोठी आहे. अंजनगाव बारी - कोंडेश्वर मार्गावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. पण रस्त्याची चाळण झाल्याने या मार्गावरुन वाहने चालविताना वाहनचालकांना अक्षरश तारेवरची कसरत करावी लागत आहे. महाशिवरात्रीला तर या मार्गावर वाहनांची संख्या प्रचंड वाढणार आहे. अशात येथे मोठी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गाची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. परिणामी रस्त्याची दूरवस्था झाली आहे.

रस्त्याचे केवळ नुतनीकरणच नाही तर वाहनांची वाढलेली संख्या लक्षात घेता रुंदीकरणही करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. महाशिवरात्री व्यतिरिक्त वर्षभर या मार्गावर वर्दळ असते. त्यानंतरही बांधकाम विभाग रस्त्याच्या दुरुस्तीत दिरंगाई करित असल्याने नागरिकांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

# धारणी वकिल संघाच्या अध्यक्षपदी ॲड. प्रेमलाल कोगेकर

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.25 )-** धारणी तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. प्रेमलाल कोगेकर यांची एकमताने निवड करण्यात आली. ॲड. राजू गोंडाने यांचा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ संपल्याने नवीन अध्यक्षाची निवड करण्यासाठी प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात ॲड. प्रेमलाल कोगेकर यांची एकमताने निवड करण्यात आली.

तसेच वकील संघाच्या उपाध्यक्षपदी ॲड. ब्रदर जोश व सचिवपदी ॲड. निलेश चौकसे यांचीही एकमताने निवड झाली. याप्रसंगी वरिष्ठ वकिल ॲड. सुभाष मनवर यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रेमलाल



कोगेकर यांचे अभिनंदन केले. यावेळी ॲड. मोहन गंगराळे, सहदेवड्ड गुप्ता, ॲड. अंकित गुप्ता, ॲड. पंकज ठाकूर, पिंटू ठाकूर, ॲड. कलमेकर, धांडे, आकाश धांडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.